प्रेषक
रितेश वीरेंद्र मिश्रा,
पुण्योदय पार्क, सी -४ ,
फळत न. १३०१,
कल्याण - पश्चिम
दि. - ०१/०४/२०१९

प्रति
मा.मुख्याधिकारी साहेब
नगररचना विभाग कुळगाव बदलापूर
नगरपरिषद बदलापूर जि. ठाणे
मा.
नगररचनाकार
नगररचना विभाग कुळगाव बदलापूर
नगरपरिषद बदलापूर जि. ठाणे
विषय:- सर्वे नं १२/१ च्या कुंपणाची/ भिंतीची झालेल्या तोडफोडीची माहिती देण्यासंदर्भात

महोदय

मी रितेश वीरेंद्र मिश्रा माझ्या कुटुंबियांसमवेत वरील पत्त्यावर राहत असुन माझ्या नावे मौजे सोनिवली येथे गट क्र. १२/१ ही जमीन मिळकत माझ्या एकट्याच्या नावे आहे (सोबत ७/१२ जोडत आहे). वरील जमीन मी दि. १०/१२/२०१५ रोजी २० गुंठे तसेच दि. ३० जून २०१६ रोजी २० गुंठे खरेदीखताद्वारे श्री अनिल तिवारी यांच्याकडून विकत घेतली आहे. सदर मिळकतीवर मी माझ्या पार्टनरशिप फर्मच्या मार्फत बांधकाम करत आहे. त्यानुसार काही जागेत रो हाउस तर उरलेल्या जागेत ९ मजली इमारत बांधत आहे.

माझ्या मिळकतीस दक्षिण बाजूला सर्वे न. १२ हिस्सा न. २ लागून आहे. सदर हिस्सा हा ५५ गुंठ्यांचा असुन त्याची विभागणी ७/१२ नुसार पुढील प्रमाणे

१) सुनंदा नंदराज कडव आणि सिंधुबाई एकनाथ आगिवले- सामाईक - ५ गुंठे
२) बाळू कातोड मडके आणि रवींद्र गणपत जाधव - सामाईक - १० गुंठे
३) राज एकनाथ आगिवले - २० गुंठे
४) प्रशांत नंदराज कडव - २० गुंठे
(सोबत सर्वे नं १२/२ चा ७/१२) जोडत आहे

स्विकारले
आवक- [illegible]
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
दि. 14/2019

माझ्या मिळकतीची सर्वे नं. १२/१ सरकारी मोजणी झालेली आहे (सोबत T.L.R. ची प्रत जोडत आहे) मोजणी प्रमाणे मी माझ्या मिळकतीच्या दक्षिण बाजूस कायम स्वरूपी कुंपण/ भिंत बांधली होती (सोबत पूर्ण बांधलेल्या भिंतीचे फोटो जोडत आहे) परंतु दि. २९/०३/२०१९ रोजी माझ्या शेजारील मिळकतीतील हिस्सेदार सौ. सिंधुबाई एकनाथ आगिवले , राज एकनाथ आगिवले, आणि एकनाथ आगिवले यांनी सकाळी ९.४५ रोजी काही समाजकंटक तसेच गुंडांना घेऊन JCB च्या सहाय्याने मिळकतीस सरकारी मोजणी प्रमाणे घातलेल्या भिंतीची/ कुंपणाची तोडफोड करून (सोबत तोडलेल्या भिंतीचे फोटो जोडत आहे) तसेच नासधूस करून उपस्थित माझ्या कामगाराला शिवी गाळ आणि जीवे मारण्याची धमकी देत माझे ४ ते ५ लाखाचे नुकसान केले आहे.

आगिवले कुटुंबीय सोडून सदर सर्वे नं १२ हिस्सा नं. २ मधील इतर जमीन धारकांची म्हणजेच सुनंदा नंदराज कडव, प्रशांत नंदराज कडव, बाळू कातोड मडके, रवींद्र गणपत जाधव यांची माझ्या मिळकतीच्या कुंपणा / भिंती संदर्भात कोणतीही तक्रार अथवा हरकत नाही आणि आगिवले कुटुंबीय केवळ मला त्रास देण्यासाठी आणि पैसे उकळण्यासाठी सदर कृत्ये करीत आहेत.

आम्ही Revised Plan साठी दि. ०३/१२/२०१८ रोजी अर्ज दाखल करून फी भरलेली आहे(फी भरलेली पावती जोडत आहे) परंतु आगिवले कुटुंबाने अनधिकृतपणे माझ्या कुंपणाच्या केलेला तोडफोडीमुळे माझे Revised Plan पास व्हायलाही विलंब होत आहे. त्यामुळे माझे आणि माझ्या कंपनीचे नुकसान होत आहेच परंतु आमच्याकडे घर बुक केलेल्या ९० मध्यम आणि गरीब कुटुंबाचेही आर्थिक आणि मानसिक नुकसान होत आहे. तरी कृपया आपण सदर घटनेचा विचार करून आगिवले कुटुंबावर कायदेशीर कारवाई साठी मदत करावी तसेच माझ्या Revised Plan च्या अर्जावर विचार करून लवकरात लवकर मला ते मिळवून द्यावे ही विनंती.

आपला विश्वासू

(रितेश वीरेंद्र मिश्रा)

जोडन असलेला प्रत :-

1) सर्वे नं. 12/1 चा 7/12
2) सर्वे नं. 12/2 चा 7/12
3) सर्वे नं. 12/1 ची TLR copy.
4) सर्वे. नं. 12/1 च्या दक्षिण बाजूस केलेल्या कंपाऊंडचे फोटो
5) 29/03/2019 रोजी समाजकंटकांनी तोडलेल्या कंपाउंडचे CCTV द्वारे काढलेले फोटो
6) Revised Plan Scrutiny साठी असलेला फीची पावती
7) CCTV फुटेज ची CD